# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक ०४/०५/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

## खून करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन जन्मठेपेची शिक्षा

**पो.स्टे. भिवापुर** :— दिनांक २७/०५/२०१९ चे २०.१४ वा. पूर्वी फिर्यादी नामे— दारासिंग मनोहर डडमल, वय ३३ वर्ष, रा. लोनारा यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे अप. क्र. २८८/२०१९ कलम ३०२, २०१, ३४ भादवी सहकलम ३(२) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. १९८९. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २२/०५/२०१९ चे १२.०० वा. चे पूर्वी आरोपी १) रोशन बाबाजी देवके वय २३ वर्ष याचे मृतक नामे— सौ. उर्मिला गजानन धारणे, वय ४० रा. नांद भिवापुर हिचे सोबत प्रेम संबध व एकत्र राहत होते. आरोपी क्र. १ ने घटना तारीख वेळी तिचा गळा दाबुन जिवानिशी मारले. आरोपी क्र. २) सचिन अमृत धरत वय ३० वर्ष, ३) सुनील अर्जुन ढोणे, वय २७ वर्ष व ४) बाबाजी नेमा देवके, वय ५५ वर्ष सर्व रा नांद ता भिवापूर यांनी पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने प्रेत जमिनीत पूरविन्यात सहकार्य केले.

. सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर आंबोरे, पो.स्टे. भिवापुर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक ०४/०५/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. सुनिल पाटील, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपी क्र. १ याला ३०२ भादवी व कलम ३(२) बी अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. १९८९. मध्ये आजन्म कारावास व २५,०००/—रू. दंड (प्रत्येकी कलमान्वये) दंड न भरल्यास २ महिने साधा कारावास, कलम २०१, ३४ भादवी अन्वये आरोपी क्र. १ ते ३ यांना प्रत्येकी ५ वर्ष सश्रम कारावास व १०,०००/—रू. दंड व दंड न दिल्यास २ महीने साधा कारावास तसेच कलम ११८ भादवी मध्ये आरोपी क्र. ४ ला ४ वर्ष सश्रम कारावास व ५,०००/—रू. दंड व दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. प्रशांत साखरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी व कर्मचारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, सुनिल डोंगरे, तुलाराम खडसे, पोहवा श्री. मनोज तिवारी व पोहवा प्रकाश वर्मा यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**